# REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017


## 'अंनिस इस्लामपूर शाखा : स्थानिक सामाजिक चळवळ : एक दृष्टीक्षेप'




प्रा. मनिषा श्रेणिककुमार पाटील
के.बी.पी. कॉलेज उरूण इस्लामपूर.


इस्लामपूर हे वाळवा तालुक्यातील मोठे शहर (तहसिल ठिकाण), मुस्लिम व्यवसायिकाच्या सान्निध्यामुळे त्यास इस्लामपूर हे नांव मिळाले. हे व्यवसायिकदृष्टया महत्त्वाचे केंद्र आहे. कारण इस्लामपूर हे कराड, सांगली, कोल्हापूर यांना मध्यवर्ती ठिकाण आहे. जवळच ताकारी रेल्वे स्टेशन आहे. इस्लामपूर नगरपालिकेची स्थापना 1852 मध्ये झाली.[1]

### इस्लामपूर पुर्वइतिहासः–

शिवकाळातही इस्लामपूर शहरास महत्व होते. सरदार आनंदराव मंत्री यांचे ठाणे होते. येथेच त्यांचे कुटुंबीय रहात होते. येथे एक मुस्लिम धर्तीचा किल्लाही होता. (येथिल गर्ल्स हायस्कुलजवळ) परंतू कालओघात तो नष्ट झाला.[2] यांचे मुळ पुरूष नारोराम रंगराव (मुळ ठिकाण – कोचरे ता. वेगुंर्ला जि. रत्नागिरी) 1691 मध्ये त्याची धनाजीराव जाधव यांनी राजघराण्याचे मंत्री म्हणून नेमणूक केली.[3] 17 वर्षांनतर 1708 मध्ये शाहू सातारच्या गादीवर परत येणार होते. पण ताराराणीचा विरोध होता. त्यांनी सेनापती धनाजी जाधव यांना तसा आदेशही दिला होता.[4] धनाजी जाधव यांनी शाहूंची फौज, खेड या ठिकाणी भीमा नदीच्या काठी पुणे जिल्हयात सामोरी येताच शाहुना धनाजी जाधवांच्या मोठया फौजेचा अंदाज आला. तेव्हा शाहूंनी धनाजी जाधवांचे दिवाण 'नारोराम' यांच्याशी प्राथमिक वाटाघाटी केल्या.[5] धनाजी जाधवांना ताराबाईनी 'दुधभाताची शपथ' दिली होती. त्यामुळे शपथ खरी करण्यासाठी दिवाणांच्या सल्ल्याने धनाजी जाधवांनी मोकळया तोफांनी लढाई केली. नारोरंगराव छत्रपतींच्या बाजूनी राहिले. शाहूनी त्यांना 'राजाज्ञा' हा किताब दिला. 1715 पासून वार्षिक 10000 होन वार्षिक मानधन मंजूर केले.[6] व मंत्रीपदावर आरूढ केले. आणि काही जिल्हे इस्लामपूर आसपासचा प्रदेश वतन म्हणून मंजूर केले. हे 'इनाम' म्हणून देऊन 'सरदेशमुखी' प्रशासन त्यांच्याकडे सोपविले. 1747 मध्ये त्यांचा मृत्यू झाला.[7]

सद्या नारोराम दिवाण यांचे वारसदार दादासाहेब मंत्री व त्यांचे चिरंजीव 'रणजित मंत्री' इस्लामपूरमध्ये स्थायिक आहेत आणि इस्लामपूरच्या विकासात योगदान देत आहेत.

### इस्लामपूर मधील 'अंनिस' चळचळीचा प्रारंभ

इस्लामपूर हे एक परिवर्तनाचा वारस लाभलेले शहर आहे. कै. आचार्य जावडेकर, कै. एम. डी. पवार, दिवाणबहादूर युसुफभाई सावरकर, राजारामबापू पाटील, डॉ. एन. डी. पाटील यांचाही हातभार मोठया प्रमाणात

इस्लामपूरच्या परिवर्तनास लागलेला आहे. सामाजिक, सांस्कृतिक वारस्याबरोबरच जाणीव जागृतीचाही वारसा आहे. भारतात औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ 1857 नंतरचा कालखंड मानला गेला. शिवकाळात असणाऱ्या श्रध्दा–अंधश्रध्दापेक्षा पेशवे काळात अंधश्रध्दांचे पेव फुटले होते. याचे उदाहरण सांगायचे झाल्यास शाहू महाराज 1749 साली आजारी पडले. त्यातच त्यांची अखेर झाली. त्यावेळी त्यांचे वय साठीच्या पुढे होते. अशा वयात त्यांना दृष्ट लागण्याचा किंवा त्यावर भुते घालण्याचा संभव काय असणार! तथापि त्यास उपचार करण्यास शक्य तेवढे वैद्य व पंचाक्षरी बोलावलेले दिसते.[8] अशा अंधश्रध्दा समाजास लागलेला कृष्ठरोग आहेत.

इस्लामपूरला पूरोगामी नेतृत्व लाभले आहे. अशा जागृतीमधूनच अंध्दश्रध्दा निर्मुलन समितीचा जन्म झाला. फेब्रु. 1990–91 मध्ये जोतिष्याच्या माध्यमातून 'बिहारी बुवानी; केलेली फसवणूक उघडकीस आणली आणि अंधश्रध्दा निर्मुलन चळवळीस प्रारंभ झाला.[9]

या चळवळीचे अध्यक्ष डॉ. एन. डी. पाटील व कार्याध्यक्ष नरेंद्र दाभोळकर होते.[10]

अंधश्रध्दा निर्मुलन समिती (अंनिस) ही कल्पना डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची, त्यांनीच 'अंनिस' हे नांव या संघटनेस दिले.[11] संस्थापक सदस्यांमध्ये प्रा. एल. डी. पाटील, प्रा. एस. एस. पाटील, डॉ. नितिन षिंदे, संजय बनसोडे, डॉ. एच. टी. दिंडे, डॉ. एस. बी. माने, प्रा. ए. बी. कुलकर्णी यांचा समावेश होता. सांगली जिल्हयामध्ये हे इस्लामपूरचे युनिट जास्त प्रखरपणे काम करताना दिसते.[12] सुरूवातीस या इस्लामपूर युनिटचे अध्यक्ष एल. डी. पाटील व कार्याध्यक्ष प्रा. सर्जेराव पाटील होते.

## अंनिस चळवळीचे इस्लामपूरमधील स्वरूप

या चळवळीत विविध विषय आहेत. मुख्य हेतू अंधश्रध्दा निर्मुलन फलज्योतिष, भानामती, देव–देवस्की, वास्तूशास्त्र, बुवा–बाबांचा बंदोबस्त, भ्रष्टाचार निषेध, भूतबाधा यांचा भांडाफोड दैनंदिन जीवनात वैज्ञानिक जागृती करणे हा उद्देश. या अंनिस समितीची बैठक दर 'गुरूवारी' होते. त्यामध्ये विविध उपक्रम, शिबिरे, परिषदा, निषेध,व्याख्याने यावर चर्चा होते.[13]

या चळवळीचे वार्षिक नियोजन केले जाते. कोणतीही चळवळ चालविण्यासाठी आर्थिक नियोजन केले जाते. या चळवळीचे मासिक निघते. त्यासाठी वर्गणीदार मिळवले जातात. कॅलेंडर, कार्यक्रमात मानधन, जाहीराती, वार्षिक दिवाळी अंक यातूनच विविध उपक्रम, शिबिरे, पथनाटये इ. कार्यक्रम घेतले जातात. कित्येकवेळा सदस्यानाही पदरमोड करावी लागते.[14]

## चळवळीची व्याप्ती

या अंध्दश्रध्दा निर्मुलन समितीच्या 135 शाखा आहेत.[15] या शाखा महाराष्ट्र व गोवा या ठिकाणी आहेत.

## अंनिस ची चतु:सुत्री

1) शोषण करणाऱ्या फसवणूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या अंध्दश्रध्दांच्या विरोधात प्रबोधन व संघर्ष करणे.
2) जनमानसात विशेषतः विदयार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टीकोन रूजविणे.
3) धर्माची विधायक कृतिशील चिकित्सा करणे.
4) व्यापक चळवळीशी स्वत:ला जोडून घेणे.[16]

## अंनिस इस्लामपूर शाखेचे कार्य / उपक्रम

1. **जटा निर्मुलन :–** देवदासी देवर्षि भगत, बुवाबाबा, 'जटा' वाढविण्यास प्रोत्साहन देतात. इस्लामपूर शाखेने 1991 पासून जटा निर्मुलनाचे कार्य केले आहे. वाळवे तालुक्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्रव्यवहार करून जटाधारी व्यक्तिची माहिती मिळाल्यावर 25 मे अखेर (21/09/1991 पासून) जटा निर्मुलन केले. 1994 अखेर 28 लोकांचे जटा निर्मुलन केले. जटा निर्मुलन करणाऱ्या व्यक्तिस शाखेच्या वतीने सत्कार व

पेहराव देण्यात आला.[17] ज्यांचे जटा निर्मुलन झाले त्यामध्ये वय वर्षे 9 ते 55 वर्षे पर्यंतच्या व्यक्ति होत्या. यात प्रामुख्याने छोटी मुले व स्त्रियांचा मोठया प्रमाणात सहभाग होता.

2. **बुवाबाजी विरूध्द संघर्श :–** अंनिस युनिटने इस्लामपूर मधील अंबाबाई मंदीरात जनतेची फसवणूक करणारे 4 साधून गजाआड केले. त्यांच्याकडे 88 हजाराचा माल सापडतात.[18] अशा आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण करणाऱ्या 20 बुवांचा पर्दाफाश केला.

बागणीच्या एका महिलेने घरात तुरबत वरील आल्याचा दावा केला होता. तो खोटा असल्याचे समितीने सिध्द केले.[19]

3. **आंदोलन/सत्याग्रह :–** डोंगरवाडी येथे फक्त गोडेतेलाचे दिवे जाळले जात होते. रॉकेलचे दिवे लावणे. निषिधः मानले जात होते. येथे मारूती मंदीर होते. असे रॉकेलचे दिवे जाळल्यास घरात मृत्यू होतात असा संकेत होता. अंनिस शाखा इस्लामपूरने आंदोलन करून लोकप्रबोधन करून अनेक वर्षापासूनचना रिवाज बंद पाडला.[20]

## शनि शिंगणापूर समता सत्याग्रह – 2000 –

शनि शिंगणापूर देवालयात महिलाना प्रवेश देण्यासंबंधी डॉ. एन. डी. पाटील, डॉ. श्रीराम लागू, अंनिस कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.[21] अनेक वर्षापासून हा रिवाज चालत आला आहे. अंनिसने मोठया प्रमाणात या गोष्टी संदर्भात आंदोलन केले.

## 'सनातन प्रभात' विरोधी मोर्चा (2002) –

म. फुले विरूध्द लेखन (अवमानाकारक लेखन) निषेध मोर्चा (2002 दै. सकाळ सप्टे. 2002 – पान नं. 1) प्रजापिता ब्रम्हकुमारी विरोधी आंदोलन, भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात लाचप्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक लिपीकास अटक करण्यात आली.[22] ही आंदोलने अंनिसने केली.

4. **सडक नाटक :–** (पथनाटय) 30 जून 2001 साली लातूर येथे झालेल्या 'शैक्षणिक व विवेक वाहिनी' परिषदेमध्ये प्रथमतः शाखेने 'एक प्रश्न' हे कष्टकऱ्यांच्या व्यथा मांडणारे व राबणाऱ्यांचा खरा इतिहास पुढे आणणारे, सडकनाटक करून या चळवळीला प्रारंभ केला. कोल्हापूर, सांगली, पुणे, लातूर, सोलापूर, सातारा, बीड, मुंबई इ. जिल्हयात सडकनाटकांचे अनेक प्रयोग केले.[23]

## सडक नाटक विषय एक प्रश्न (कामगार प्रश्न)

प्रॉडक्ट, (शिक्षण व्यवस्था), अंगभर सोनं की सोन्यासारखी मुलगी (हुंडाबळी), चमत्कारिक सकाळ (महिला व्यथा), माझे बालपण (बाल मजुरी), अंधश्रध्दा (बुवाबाजी) गिनिपीग (शेतकरी आत्महत्त्या), ग्रामस्वच्छता (सुंदर स्वच्छ गांव), औरत (महिला प्रश्न), आंधळ शतक (स्वांतत्र्यप्राप्तीची साठ वर्षे) एड्स (माहितीपट), जाग माणसा जाग (आद्य परिस्थिती भाष्य), अंधाराने सुर्य पाहिला तेंव्हा (रेड लाईट – वेश्या प्रश्न), शिवनाथ कांती (छत्तीसगड नदी विकली) , जागतिकीकरण (खाजगीकरण), शिक्षणाची गाडी (शिक्षण व्यवस्था), चॅनेल हंगामा (प्रसारमाध्यमे विडबंन), पोरं कुठ गेलीत सारी (वंचित शिक्षण प्रश्न), देश तुझा (खाजगीकरण)[24]

अशा अनेक सामाजिक विषयावर भाष्य करणारी पथनाटये करून प्रबोधनाचे कार्य अंनिसने केले.

## अनेक होळया

पारंपारिक होळयांना फाटा देवून, पर्यावरण संवर्धन करण्यासाठी प्रबोधनासाठी अंनिसने विविध होळयांचा पायंडा पाडला. इस्लामपूरमध्ये 'गुटखा बंदी' उपक्रम राबविण्यासाठी गुटख्याची होळी केली. पर्यावरण संवर्धनासाठी कचऱ्याची होळी केली. अंध्दश्रध्दा दूर करण्यासाठी सनातन विचारांची होळी केली. यामध्ये जागृत नागरिक व कार्यकर्ते यांचा मोठया प्रमाणात सहभाग होता.[25] तसेच एक गाव एक गणपती. गणपती दान, गणपतीचे बादलीतील विसर्जन हे उपक्रम ही राबविले जातात.

## प्रबोधनपर चित्रपट

प्रसार माध्यमे समाजाचा आरसा असतात. त्यामध्ये चित्रपट हा समाज मनावर जास्त प्रभाव टाकणारे साधन आहे. अंनिस तर्फे असे अनेक प्रबोधनपर चित्रपट दाखविले जातात. सर्पविज्ञान, मुक्ता, जैवविविधता, ॲनिमल्स आर ब्युटिफुल (द. आफ्रिकेतील जंगलाची माहिती देणारा चित्रपट), तिसरी आजादी (इतिहासाच्या सत्यतेवर प्रकाश), डॉ. बाबासाहेब आंबेडकर द व्हाईस ऑफ गुजरात (गुजरात दंगल), 10 वी फ (वंचितांच्या शिक्षणावर), गाडगे महाराज (जीवन व चरित्रावर आधारित चित्रपट दाखविले गेले. याबरोबरच परिणामकारक प्रबोधनाची गाणी सादर केली जातात.[26] प्रबोधनपर सभा, शाळा भेट असे कार्यक्रम होतात.

## फलज्योतिष सत्यशोधन परिषद

2001 मध्ये इस्लामपूर फलज्योतिश सत्यशोधन परिषद भरली. इस्लामपूर बस स्टॅंडसमोर 'बचतधाम' या ठिकाणी ती होती. 5 सप्टें. 2001 मध्ये नरेंद्र दाभोळकर आपल्या भाषणात म्हणाले की, ''ज्योतिषाना ग्राहक संरक्षण कायदा लागु करा.'' मानवी कर्तृत्व ग्रह गोलावर अवलंबून नाही. ज्योतिष ही सामान्य माणसाला स्वप्ने विकणारी रंजक कला आहे. विद्यापीठीय अभ्यासक्रमात फलज्योतिषांचा समावेश करावा असे सुचविणाऱ्या विद्यापीठ अनुदान मंडळावर मोर्चा काढला पाहिजे.'' असे त्यांचे मत होते.

या परिषदेत काही ठराव पास करण्यात आले ते पुढीलप्रमाणे

1. वृत्तपत्रांनी ज्योतिष विषयक कॉलम प्रसिध्द करताना 'हे फक्त मनोरंजनासाठी' अशी ओळ छापावी. 2. पत्रिका न पाहता लग्न करू. 3. फलज्योतिष हे ब्राम्हण्यवादी वृत्ती व पुरोहितशाहीचे पुनर्जीवन आहे. 4. दैववादाचा नकाशा असलेल्या कुंडलीची जाहीर होळी करू. 5. ज्योतिष अभ्यासक्रम सुरू न केल्याबद्दल विदयापीठाचे अभिनंदन 6. ज्योतिषांना ग्राहक संरक्षण कायदा लागू करा.[27]

## अंनिसची शिबिरे

अंनिस तर्फे अनेक विविध शिबिरांचे आयोजन करण्यात येते. सृष्टी संस्था (बहुउद्देशीय संस्था इस्लामपूर) व अंनिस तर्फे 'पर्यावरण शिबिर' सागरेश्वर अभयारण्यात आयोजित करण्यात आले. या शिबिरास विविध महाविद्यालयातील 50 हून अधिक विदयार्थी आले होते.[28] शिबिरातून प्रबोधन होते. कार्यकर्ते तयार होतात. अंधश्रध्देचे उन्मूलन होते.

''वैज्ञानिक जाणिव शिबिर''' 4 व 5 ऑक्टोंबर 2010 मध्ये सांगली येथे आयोजित करण्यात आले या शिबिरात आपल्या व्याख्यानात शिवाजी विदयापीठाचे कुलसचिन डॉ. कांकरिया म्हणाले 'वैज्ञानिक जाणिवानी युवकाना संस्कारित करण्याची गरज आहे.[29]' या शिबिराचे संयोजन संजय बनसोडे यांनी केले. ग्रह तारे आयुष्य घडवित नाहीत वैज्ञानिक जाणिव असेल तर ज्योतिष, कुडमुडे यांची दुकाने बंद होवून भूतबाधा, जखिण, डाकिण, दृष्ट लागणे यासारख्या प्रथा बंद होतील. एक विज्ञानवादी जाणिव देवदेवस्कीची कुबडी आणि लंगडा स्वप्नविलास दूर होईल असे अंनिसचे मत आहे.

## सद्भावना उपोशण

सांगली – मिरज येथे झालेल्या दंगलीमुळे नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले. यात सामान्य माणूस भरडला जातो. हे कोठेतरी थांबले पाहिजे या प्रामाणिक भावनेतून महाराष्ट्रातील जेष्ठ सामाजिक विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. गोविंद पानसरे यांच्या नेतृत्वाखाली 'सद्भावना उपोषण' घडून आले. (स्थळ क. भा. पा. महाविदयालय, इस्लामपूर, 9 सप्टेंबर 2009 – सकाळी 11 ते 5)[30] जाती, धर्म, वंश या नावावर होणारी जनतेची फसवणूक दूर करणे हा हेतू होता.

## आंतरराष्ट्रीय खगोलवर्ष (2009)

सन 1609 मध्ये गॅलिलिओने स्वतः निर्माण केलेल्या दुर्बिणीतून चंद्राचे निरीक्षण केले. चंद्रावर खड्डे असल्याचे सांगितले. या घटनेस 2009 मध्ये 400 वर्षे पूर्ण झाली. युनेस्कोने 2009 हे वर्ष आंतरराष्ट्रीय खगोलवर्ष जाहीर केले. या निमित्ताने 'अंनिस' ने खगोलशास्त्र अभ्यास व माहिती देण्यासाठी कार्यशाळा हिंगणघाट येथे घेतली. यामध्ये विश्वाची उत्पत्ती, लार्ज हेडॉन कोलायडर खगोलीय अविष्कार, अंतराळ यात्रींचे योगदान, फलज्योतिष्याची चिकित्सा इ. विषयावर डॉ. नितीन शिंदे, शंकर शेलार, प्रा. प्रकाश पारखे, संजय बनसोडे, प्रमोद गंगणमाले इ. नी खगोलशास्त्रची माहिती दिली. 4 इंची दुर्बिणीच्या माध्यमातून चंद्रावरील खड्डे, गुरूचे उपग्रह, शनिच्या कडीची माहिती दिली.[31]

## अंधश्रध्दा निर्मुलन कायदा प्रयत्न

अंनिसने अंधश्रध्दा निर्मुलन कायदयासाठी वारंवार प्रयत्न केले आहेत. अंधश्रध्दा निर्मुलन कायदा प्रबोधन जनजागृती मोहिम अंनिसने राबविली. 1. या कार्यक्रमास सिनेअभिनेते 'सदाशिव अमरापूरकर' उपस्थित होते. या कार्यक्रमात अंधश्रध्दा निर्मुलन 'मशाल' पेटविण्यात आली. ते म्हणाले, ''अनेक चित्रपटांचे निर्माते मुहूर्तासाठी आग्रही असतात. त्यावेळी आपण त्यांना सांगतो, ज्या चित्रपटांचे मुहूर्त मी केले ते चित्रपट चालले नाहीत.'' ते निर्माते क्षणात आग्रह सोडतात.[32] (देवाच्या नवसासाठी बच्चनही अनवाणी गणपती दर्शनास जातात.)

2. जादूटोणा विरोधी कायदा व्हावा म्हणून अंनिस सदस्यांनी 1 लाख 25 हजार थोबाडीत मारून घेतल्या. (अंनिस सत्याग्रह)[33]

3. जादूटोणाविरोधी कायदयासाठी अंनिसने शासनास रक्ताचे (रक्ताने लिहिलेले) पत्र सादर केले.

60 कार्यकर्त्यांनी शासनास हे पत्र सादर केले. त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे, ''सादर नमस्कार महाराष्ट्रातील संत व समाज सुधारकांचा वारसा स्मरावा व जादूटोणाविरोधी कायदा संवेदनशिलतेने त्वरित मंजूर करावा ही कळकळीची विंनती रक्ताने हे पत्र लिहून आपणास करीत आहोत.''[34] नरेंद्र दाभोळकर, लीलाताई पाटील, ज्योती आदाटे, संजय बनसोडे, राहूल थोरात, फारूक गवंडी यांचा यामध्ये समावेश होता.

अनेक प्रकार होवून ही याविरोधी कायदा नाही. 'सत्यसाई बाबांचे बिंग फुटले तरीही शासनाने असा कायदा केला नाही. बुवा बाबाना पकडले तरी त्यांना समज देवून त्यांच्याकडून असे होणार नाही असे पोलिसांकरवी लिहून घेवून सोडून दिले जाते.[35]

## अंनिस विरोधी लेखन व कारवाया

गुरूवार 16 फेब्रु. 2006 रोजी अंनिसने अंधश्रध्दा निर्मुलन कायदयाची मशाल पेटविली. तेव्हा हिंदू जनजागृती संस्थेने पोलिसांकरवी, धर्माविरूध्द बोलू नका' अशी नोटीस दिली. ज्योवळी पोलीस निरोप घेवून आले त्यावेळी कार्यकर्त्यांनी सहीला नकार दिला. शिवाय एन. डी. पाटील यांनी पोलीसांना तुमचेही संरक्षण नको आणि त्यांचे कुणी कार्यकर्ते असल्यास 'तंगडया तोडू' असा दम भरला.[36]

या अंनिस संघटनेबद्दल सनातन प्रभात व पुण्यनगरी या पत्रकात विरोधी लेखन येते. 1. पुण्यनगरी या वर्तमान पत्र पुरवणीत भाऊ तोरसेकरांचा लेख येतो त्यामध्ये ते म्हणतात. 'नरेंद्र दाभोळकर आणि अंधश्रध्दा निर्मुलन म्हणून चाललेली भोंदूगिरी हा स्वतंत्र लेखमालेचा विषय आहे. एखादया भोंदू भगताचे अनुयायी भक्त गण जेवढे आपल्या मठाधिशाबद्दल संवेदनशिल नसतात त्यापेक्षा विज्ञाननिष्ठांची अंधश्रध्दा तीव्र असते.' ते श्रीराम लागुबद्दल म्हणतात, 'देवाला रिटायर करा म्हणणाऱ्या श्रीराम लागूनां भारत मेडीकल कौन्सिलने पाठविलेली नोटीस लक्षणीय आहे. तुम्ही जाहीरातीतून जनमानसात गैरसमज निर्माण करत आहात. तुमची वैदयक पदवी रद्द का करू नये.' अशी ती नोटीस होती.' (वेदनाशामक गोळी जाहीरात)[37]

2. पुण्यनगरीतील 'विज्ञान निष्ठतेत ही अंधश्रध्दा' या लेखात तोरसकर म्हणतात, जेव्हा खरोखर बुध्दीवादी समाजाचे प्रबोधन करीत होते. तेव्हा आजच्यासारखे बुवा महाराजांचे पेव फुटले नव्हते. अर्धवटरावांच्या बौध्दीक थोताडांने समाजाला हतबल केल्याने बहुसंख्य समाज अध्यात्म किंवा अंध्दश्रध्दांकडे झुकू लागला आहे.[38]

3. तोरेसकर आणखी एका लेखन म्हणतात 'स्टीफन हॉकिंग' या शास्त्रज्ञाच्या 'कृष्णविवराच्या सिध्दांताला' एका आभास मित्रा नावाच्या भारतीय शास्त्रज्ञाने आव्हान दिले होते. पण त्याच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. (विज्ञान निष्ठानी)[39]

अशा लेखनासाठी निषेधसभा, बैठका घेतल्या जातात परंतु कार्य चालूच रहाते.

अंनिस ने 1991 ते 2011 या कालखंडात विविध उपक्रम राबवुन 'अंधश्रध्दा निर्मुलन व प्रबोधनाचे कार्य सुरू ठेवले आहे. त्यामध्ये दिवाळी निमित्त फटाके विरोधी मोहीम (फेरी) काढली जाते. 2001 मध्ये गणपतीदान उपक्रमात 200 गणेशमुर्ती दान केल्या गेल्या. सर्पविज्ञान, आकाश निरीक्षण, बालविज्ञान, युध्द व अण्वस्त्र विरोधी अभियांन, व्यसनमुक्ती, संमोहन पशुहत्या विरोधी अभियान, विज्ञान बोध वाहिनी व सर्वात महत्वाची विवेक वाहिनी चालविली जाते. ज्यामध्ये कॉलेजमधील विदयार्थ्यांच्या मनात प्रबोधन होण्याच्या हेतून ही वाहिनी चालवितात. यामध्ये प्रबोधनात्मक व्याख्यान, चर्चा, बैठकांचे आयोजन होते.

अंनिसने नोंदणीपध्दतीने लग्न करणाऱ्या व आंतरधर्मिय लग्न करणाऱ्या जोडप्यांचे सत्कारही घेतले.

नरेंद्र अच्युत दाभोलकर हे महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांची 20 ऑगस्ट 2013 रोजी सकाळी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदीरा नजिक असलेल्या ओंकारेश्वर पुलावर अज्ञातानी 4 गोळया घालून हत्या केली. तरीही अंनिसचे कार्य थांबलेले नाही. त्यांचे पुत्र हमीद दाभोलकर व मुलगी मुक्ता दाभोलकर आज ही चळवळीत कार्यरत आहेत. अग्रेसर आहेत. बंदुकीच्या गोळयानी विचार मरत नाहीत. हिंसा करून सर्वांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न असतो. दाभोलकराना आपल्या विचारांची किंमत प्राणांची आहुती देवून चुकवावी लागली.

आज इस्लामपूरमध्ये समाजाचा काही प्रमाणात विरोध पत्करून 'नास्तिक' बिरूदावली घेवुनही प्रबोधनाचे कार्य प्रा. एल. डी. पाटील, डॉ. एन. डी. पाटील, हमीद दाभोलकर, संजय बनसोडे, डॉ. नितिन शिंदे, प्रा. सतिश चौगुले, सर्जेराव पाटील व प्रमोद गंगणमाले अव्याहतपणे करीत आहे. त्यांचे प्रेरणास्थान डॉ. एन. डी. पाटील आहेत. डॉ. नितीन शिंदे यांनी सफर विश्वाची या पुस्तकाद्वारे वैज्ञानिक जाणिव जागृतीस चालना दिलेली आहे.

## निष्कर्ष :–

1. इस्लामपूरमधील 'अंनिस' युनिट प्रभावीपणे कार्यरत आहे.
2. अंधश्रध्दा निर्मुलनासाठी 'मानसिक परिवर्तनाची' गरज आहे.
3. रूढी परंपरा, जातीयता, धर्मांधता जोपासणाऱ्या समाजाची प्रगती खुंटते.
4. दैववादास मानणाऱ्या समाजाचे प्रबोधन करण्यात 'शिक्षक लोक' अंनिस चळवळीद्वारे कार्यरत आहेत.
5. या चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग अतिशय कमी आहे.
6. अंधश्रध्देस बळी पडणाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.
7. गरीब, कष्टकरी जनतेस प्रबोधनाद्वारे विकासाचा मार्ग दाखविला जातो.
8. राजकीय पटावर इस्लामपूर महत्वाचे केंद्रीभूत ठिकाण असूनही निर्भयपणे 'अंनिस आपली चळवळ चालवित आहे.
9. कोणताही वैयक्तिक स्वार्थ न ठेवता 'अंनिसचे; कार्यकर्ते अव्याहतपणे प्रबोधनासाठी कार्यरत आहेत.
10. नरेंद्र दाभोलकर यांच्या मृत्यूनंतरही अंनिस अत्यंत सक्षमपणे कार्य करीत आहे.

## संदर्भ सूची

1. Maharashtra State Gazetter, Govt of Maharashtra, (Sangli District) page No. 744
2. कित्ता पृष्ठ कं. 744
3. कित्ता पृष्ठ कं. 745

4. कित्ता पृष्ठ कं. 745
5. कित्ता पृष्ठ कं. 746
6. कित्ता पृष्ठ कं. 746
7. कित्ता पृष्ठ कं. 746
8. भावे वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र वरदा प्रकाशन पुणे, 1998 पृष्ठ कं. 222
9. अंनिस कार्यकर्ते डॉ. नितिन शिंदे यांची मुलाखत वेळ संध्या 7 वाजून 15 मि.
10. पाटकर प्रदीप, मनोविकार व भूतबाधा – पृष्ठ कं. 6
11. अंनिस सदस्य डॉ. नितिन शिंदे यांच्या मुलाखतीद्वारे
12. अंनिस अध्यक्ष प्रा. पाटील एल. डी. यांच्या मुलाखतीद्वारे (वेळ सकाळी 9 वाजता के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर दि. 22.10.2011.
13. डॉ. दाभोळकर नरेंद्र वैज्ञानिक जाणिवा – प्रथमावृत्ती 2000 मलपृष्ठ
14. अंनिस सदस्य डॉ. नितिन शिंदे यांच्या मुलाखतीद्वारे
15. डॉ. दाभोळकर नरेंद्र वैज्ञानिक जाणिवा – प्रथमावृत्ती 2000 मलपृष्ठ
16. कित्ता – मलपृष्ठ
17. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती शाखा इस्लामपूर वार्षिक अहवाल भाग 1 पृष्ठ कं 3
18. दै. ऐक्य 24 फेब्रुवारी 1991 पृष्ठ कं. 1
19. दै. सकाळ 12 फेब्रुवारी 2006 पृष्ठ कं. 1
20. दै. सकाळ 12 फेब्रुवारी 1007 पृष्ठ कं. 1
21. दै. पुढारी 12 जून 2000 पृष्ठ कं. 3
22. दै. सकाळ 8 जुलै 2003 पृष्ठ कं. 3
23. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती शाखा इस्लामपूर वार्षिक अहवाल भाग 1
24. कित्ता पृष्ठ कं. 76
25. दै. सकाळ नोव्हेंबर 2002 पृष्ठ कं. 2
26. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती शाखा इस्लामपूर वार्षिक अहवाल भाग 2
27. दै. सकाळ 6 सप्टेंबर 2001 पृष्ठ कं. 1
28. दै. पुढारी दि. 26 ऑगस्ट 2008 पृष्ठ कं. 4
29. दै. सकाळ दि. 2 सप्टें. 2008 पृष्ठ कं. 2
30. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती वार्षिक अहवाल सन 2009
31. कित्ता 2009
32. दै. तरूण भारत 16 फेब्रुवारी 2006 पृष्ठ कं. 1
33. दै. सकाळ 21 जुलै 2008 पृष्ठ कं. 2
34. दै. सकाळ 11 मार्च 2009 पृष्ठ कं. 2
35. डॉ. नितिन शिंदे यांच्या मुलाखतीमधून
36. दै. तरूण भारत, दै. सकाळ 16 फेब्रु. 2006 पृष्ठ कं. 1
37. दै. पुण्यनगरी 16 ऑक्टो. 2011 पृष्ठ कं. 7
38. कित्ता – 18 ऑक्टोंबर 2011 पृष्ठ कं. 7
39. कित्ता – शुक्रवार, 21 ऑक्टोंबर 2011 पृष्ठ कं. 7